International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# जननायक बिरसा मुंडा व स्वातंत्र्य संग्रामातील आदिवासी समाजाचे स्वातंत्र्यवीर

**श्री. कुलदीप केशव सानप**
*संशोधक विद्यार्थी,*
*मराठी संशोधन केंद्र, वसंतदादा पाटील महाविद्यालय पाटोदा, ता. पाटोदा जि. बीड*
*Corresponding Author – श्री. कुलदीप केशव सानप*
DOI - 10.5281/zenodo.17662176

**प्रास्ताविक :**

आदिवासी समाज हा अशिक्षित असून तो डोंगरदऱ्यात वास्तव्य करणारा आहे. या आदिवासी समाजाचे पिढ्यानपिढ्या इथल्या प्रस्थापित व्यवस्थेने शोषण केलेले आहे. परंतु हे आदिवासी जंगल, डोंगर, नद्या, दऱ्या कपारीत राहत असल्यामुळे ते शिक्षण व्यवस्थेपासून कोसोमैल दूर होते. आर्यानी केलेल्या आक्रमणानंतर त्यांनी आपले वास्तव्य डोंगर, नद्या, कपारी, जंगल येथे गुण्यागोविंदाने वसवले होते. परंतु या शहरीकरणाच्या विकासासाठी प्रस्थापित व्यवस्थेने त्यांच्यापर्यंतही मजल मारली. शेठ सावकारांनी त्यांचे वेठबिगारीच्या नावाखाली शोषण केले. मराठीमध्ये अनेक कथा, कादंबरी, कविता, आत्मकथनामधून त्याचा उल्लेख आलेला आहे. मिठाच्या बदल्यात आदिवासींकडून मध घेतला हे वास्तव आहे. परंतु या गुलामीची जाणीव ज्या आदिवासी तरुणांना झाली त्या तरुणांनी शोषण करणाऱ्या विरुद्ध आवाज उठवलेला आहे. त्यामुळे आदिवासींचे अनेक उठाव आणि क्रांतिकारही आहेत. परंतु इथल्या प्रस्थापित व्यवस्थेतील लेखनीने आणि लेखनकारांनी त्यांची दखल घेतली नाही हे विशेष मानावे लागते. त्यामुळे आदिवासी समाजातील स्वातंत्र्यवीर उपेक्षित आणि वंचित राहिलेले आढळतात. या संदर्भात गौतम निकम म्हणतात की, “स्त्रियांना राष्ट्रीय सभेत स्थान द्यावं हा काथ्याकूट करत असताना गांधीजींनीही सुरुवातीला स्त्रियांना सत्याग्रही बनवलेले नसताना आदिवासी स्त्री मात्र हातात शस्त्र घेऊन लढत होती. भूमिगत बंडखोरांना जंगलात जेवण पुरविणे, शस्त्र जमविणे, बातम्या पोचविणे आणि प्रत्यक्ष लढ्यात भाग घेणे अशी कामे आदिवासी स्त्री करायची. झाशीची राणी लक्ष्मीबाईंच्या उठावातील झलकारीबाई हुतात्मा झाल्या पण राणीचा ठावठिकाणा शत्रूला सांगितला नाही. पूर्वांचलात इंग्रज सैन्याला सळो की पळो करणाऱ्या गायडिनलूंना इ. स. 1932 साली पकडलं तेव्हा त्या अवघ्या 17 वर्षांच्या होत्या भारत स्वतंत्र होईपर्यंत त्यांना तुरुंगात राहावे लागले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही देश अखंड ठेवण्यासाठी आपले सैन्य जमवून आपल्याच फुटीर बांधवांविरुद्ध लढावे लागले. संग्रामात भाग घेतलेल्या स्त्रियांना ड्रग ट्रायल करुन मारले. आंदोलकांचा ठावठिकाणा मिळविण्यासाठी स्तनांना तुंबड्या लावल्या, विकृत अत्याचार झाले पण देशासाठी त्यांनी सगळं सहन केले. त्यांना उपेक्षित ठेवून

बालभारती कृतघ्नपणा करत आहे."[1] अशी खंत गौतम निकम यांनी व्यक्त केलेली आहे. याचाच अर्थ असा की स्वातंत्रलढ्यात फक्त आदिवासी पुरुषच नव्हते तर स्त्रियांचाही सहभाग होता. परंतु इथे स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या पुरुषांचाच इतिहास लिहिला गेला नाही तर स्त्रियांच्या इतिहासाला कधी स्थान मिळणार आहे असा प्रश्न अनुत्तरीतच राहातो.

**जननायक बिरसा मुंडा :**

29 मार्च 1857 रोजी भारतामध्ये स्वातंत्र्यासाठीचा पहिला उठाव बंगाल मध्ये झाला आणि या उठावाचे लोन संपूर्ण भारतभर पसरले. हा स्वातंत्र्याचा पहिला उठाव जरी मानत असले तरीही त्या आधी म्हणजे 1830 साली वीर उमाजी नाईक यांनी भारत स्वातंत्र्यासाठी बंड केले होते हे ही विसरता येणारे नाही. या आदिवासींच्या शोषणाची जाणीव बिरसा मुंडा यांना झाली आणि त्यांनी उलगुलान केले. असे हे बिरसा मुंडा (१५ नोव्हेंबर १८७५ - ९ जून १९००) हे १९ व्या शतकातील एक महान आदिवासी नेते आणि स्वातंत्र्य सेनानी होते. ज्यांनी ब्रिटिश राजवट आणि शोषणकर्त्या जमीनदारांविरुद्ध 'उलगुलान' (महान विद्रोह) नावाची मोठी चळवळ सुरू केली. त्यांनी आदिवासींच्या 'जल, जंगल, जमीन' या पारंपरिक हक्कांचे संरक्षण करण्यासाठी लढा दिला. त्यांचे विचार आणि चळवळ केवळ राजकीय स्वातंत्र्य मिळवण्यापुरती मर्यादित नव्हती तर त्यात आदिवासी समाजाचे पुनरुत्थान, सामाजिक सुधारणा, सांस्कृतिक अस्मितांचे रक्षण आणि शैक्षणिक जागृती यांचाही समावेश होता.

**'उलगुलान' सामाजिक विचार आणि चळवळ :**

बिरसा मुंडा यांच्या सामाजिक विचारांचा मुख्य उद्देश आदिवासी समाजातील पिढ्यानपिढ्या चालत येणाऱ्या अंधश्रद्धा, वाईट चालीरीती आणि व्यसने दूर करून त्यांच्यात एकता व स्वाभिमान निर्माण केला. बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजात पसरलेल्या जादूटोणा, भुताटकी आणि इतर अंधश्रद्धांचा जोरदार विरोध केला. त्यांनी लोकांना सांगितले की आजारपण हे दैवी कोपामुळे नव्हे, तर अस्वच्छता आणि योग्य उपचारांच्या अभावामुळे येते. त्यांनी लोकांना स्वच्छता राखण्यास आणि आरोग्याची काळजी घेण्यास प्रोत्साहित केले.

आदिवासींना दारू आणि इतर व्यसनांपासून दूर राहण्याचा संदेश दिला. व्यसनांमुळे आदिवासी समाजाची आर्थिक आणि नैतिक स्थिती कमकुवत होत होती. त्यांनी लोकांना व्यसने सोडून मेहनतीने काम करण्यास आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्यास शिकवले. बिरसा मुंडा यांनी सामाजिक भेदाभेद आणि विषमतेचा निषेध केला. त्यांनी मुंडा, उरांव आणि इतर आदिवासी जमातींना एकत्र आणून एक मजबूत समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला. यामुळे समाजातील ऐक्य वाढले आणि त्यांचा लढा अधिक प्रभावी झाला. बिरसाच्या कार्याची ओळख करुन देताना बिरसाला उद्देशून डॉ. श्याम मोहरकर हे प्रस्तावनेत लिहितात की, "झारखंड प्रदेशातील आदिवासींवर ब्रिटिश सत्ताधीश, मिशनरी, सावकार, जमीनदारांकडून सातत्याने अन्याय-अत्याचाराच्या परिमार्जनासाठीच जणू बिरसाचा जन्म झाला आहे. असे वैदू, भूमकालसह सर्वांना वाटत असते. बिरसाचे बालपण रानात सवंगड्यांसह गुरे राखत, बासरी वाजवण्यात रममाण होते. प्रारंभीचे शिक्षण गाव-खेड्यात झाल्यावर पुढील शिक्षण घेण्यास मिशनरी शाळेत प्रवेश घेण्यासाठी त्याच्या परिवाराला

ख्रिश्चन धर्म स्वीकारावा लागतो. ब्रिटिशांनी 1882 साली आणलेला जंगल-जमिनीवरचा सरकारच्या स्वामित्वाचा कायदा आदिवासींच्या हक्काविरोधी असल्याची त्यास तीव्र जाणीव होते. ब्रिटिश सत्ताधीश, पादरी यांनी बिरसाच्या आई-वडिलांसह सर्व आदिमांचे चालविलेले आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, शोषण त्याला पेटवून उठविते. या शोषणकर्त्यांविरुद्ध एल्गार पुकारुन तो आदिवासी समाजाला 'उलगुलान'चा नारा देत स्वातंत्र्याचे रणशिंग फुंकतो. ब्रिटिश सरकारला वारंवार नामोहरण करीत सर्व आदिवासींच्या मनात आत्मसन्मान, अस्तित्वाच्या लढ्यासाठी प्रेरणा देत त्यांचा भगवान बनतो."[2] या वरील संदर्भावरुन बिरसा मुंडाना शिक्षणासाठी करावा लागणारा संघर्ष दिसून येतो. तसेच आदिवासींचे होणारे आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, शोषण त्याला लढण्यासाठी प्रेरणा देते. बिरसाने नैतिक मूल्यांवर भर देताना त्यांनी सत्य, प्रामाणिकपणा आणि नैतिकता या मूल्यांवर आधारित जीवन जगण्याचा उपदेश आपल्या आदिवासी बांधवाना केला. बिरसा मुंडा यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले होते. विशेषतः जेव्हा त्यांनी ख्रिश्चन मिशनरी शाळेत शिक्षण घेतले. त्यांचे शैक्षणिक विचार केवळ पारंपरिक शिक्षणापुरते मर्यादित नव्हते तर त्यात आदिवासी समाजाच्या जागृतीचा आणि त्यांच्या हक्कांच्या संरक्षणाचा उद्देश समाविष्ट होता.

**बिरसांचे राजकीय विचार :**

बिरसा मुंडा यांच्या राजकीय विचारांचे उद्दिष्ट आदिवासींसाठी 'स्वराज्य' (स्व-शासन) स्थापित करणे हे होते. राजकीय स्वातंत्र्य बिरसांनी 'अबुआ राज एतेजाना, महारानी राज टुंडूजाना' (आमचे राज्य येईल, राणीचे राज्य संपेल) हा नारा दिला. हा नारा केवळ ब्रिटिशांना हाकलून लावण्यापुरता मर्यादित नव्हता तर आदिवासींच्या पारंपरिक स्व-शासन प्रणालीची पुनर्स्थापना करण्याचे आवाहन होते. त्या सोबतच जमिनीच्या हक्कांचे संरक्षण ब्रिटिश राजवटीने लागू केलेल्या 'जमीनदारी' व्यवस्थेमुळे आदिवासींची जमीन त्यांच्याकडून काढून घेतली जात होती. बिरसांनी या अन्यायाविरुद्ध लढा दिला आणि 'खुंटकट्टी' (सामूहिक जमिनीची मालकी) या पारंपरिक व्यवस्थेचे संरक्षण करण्याचा प्रयत्न केला.

**शोषणाविरुद्ध संघर्ष :**

बिरसा मुंडा यांनी केवळ ब्रिटिश शासनाविरुद्धच नाही तर जमीनदार, सावकार आणि ठेकेदार यांसारख्या बाह्य शोषणकर्त्यांविरुद्धही लढा दिला, ज्यांना ते 'दिकू' (बाहेरचे लोक) म्हणत असत. यासाठी बिरसांनी १८९९-१९०० मध्ये 'उलगुलान' नावाची सशस्त्र क्रांती सुरू केली. या आंदोलनात त्यांच्या अनुयायांनी गनिमी काव्याचा वापर करून ब्रिटिश पोलीस ठाण्यांवर, सरकारी इमारतींवर आणि मिशनऱ्यांवर हल्ले केले. बिरसा मुंडा यांच्या सांस्कृतिक विचारांचा केंद्रबिंदू आदिवासी अस्मिता आणि पारंपरिक मूल्यांचे पुनरुत्थान हा होता. त्यांनी 'बिरसाईत' नावाचा एक नवीन पंथ सुरू केला. ज्यामध्ये हिंदू आणि ख्रिस्ती धर्मातील काही चांगल्या गोष्टींचा समावेश होता परंतु त्याचा मूळ आधार मुंडा धर्मावर होता. त्यांनी 'सिंगबोंगा' (सूर्य देव) या एकाच देवाची उपासना करण्यावर भर दिला. यामुळे आदिवासी समाजात धार्मिक ऐक्य निर्माण झाले. बिरसांनी लोकांना त्यांच्या पारंपरिक चालीरीती, संगीत आणि नृत्य यांना महत्त्व देण्यास शिकवले. त्यांनी बाह्य संस्कृतीचा प्रभाव नाकारून स्वतःच्या सांस्कृतिक मुळांशी जोडले जाण्याचा संदेश दिला.

**आदिवासी अस्मितेचे रक्षण :**

बिरसा मुंडा यांची चळवळ केवळ राजकीय लढा नव्हती तर आदिवासींची वेगळी ओळख आणि संस्कृती जपण्यासाठीचा एक संघर्ष होता. त्यांनी आदिवासींना त्यांच्या परंपरा आणि जीवनशैलीवर गर्व करण्यास शिकवले. त्यांच्या कार्यामुळे आदिवासी समाजाला राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाली आणि स्वातंत्र्यानंतर आदिवासींच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी विविध कायदे करण्यात आले. बिरसा मुंडा यांनी केवळ २५ वर्षांच्या लहान आयुष्यात आदिवासी समाजात सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्रांती घडवून आणली. त्यांचे विचार आणि त्यांचा संघर्ष आजही लोकांना प्रेरणा देत आहेत.

**दित्या पाडवी :**

दित्या पाडवी हा ठाणेदार होता. दित्या हा खानदेशातील आहे. याची फारशी कोणतीही माहिती नाही. माधवराव पेशव्यांच्या काळात खानदेशाचा काही भाग होळकरांच्या अधिपत्याखाली होता. त्या काळात दित्या पाडवी हा तळोदे तालुक्यामध्ये वाल्हेरी या गावात ठाणेदाराची नोकरी करीत असे. पेशव्यांच्या दप्तरात त्याची नोंद ही 'दित्या भिल्ल' अशी आहे. तत्कालीन काळात दित्या पाडवी हा शूर दरोडेखोर म्हणून ओळखला जात होता. त्याने तळोदा, नवापूर, कुकूरमुंडा व भामेर या भागामध्ये दबदबा निर्माण केला होता. गढवाल्हेरी हा किल्ला त्याने राजा अजबसिंग याचा वध करुन जिंकला. यात अजबसिंगचा मुलगा व त्याच्या आईला या किल्यात बंदी करुन ठेवण्यात आले. पेशव्यांना याची माहिती मिळाल्यानंतर अक्राणीकारांनी दित्या पाडवीचा बंदोबस्त करण्याचा आदेश दिला व पेशव्यांच्या मदतीने गढवाल्हेरीवर हल्ला केला. या राजाचा भाऊ आणि त्याच्या आईची सुटका करुन दित्या पाडवीला पकडून ठार करण्यात आले.

**गुनामसिंग नाईक :**

गुनामसिंग नाईक हे खानदेशातील एक अपरिचित असे वीर पुरुष आहेत. यांचा उल्लेख फार कमी लोकांच्या मौखिक इतिहासात आढळतो. हे गुनामसिंग दुसरे तिसरे कोणी नसून खाजा नाईक याचे ते वडील होत. 1818 शेच्या काळात गुनामसिंग नाईक यांचे वजनदार नायक म्हणून त्यांची ओळख होती. पळासनेर, सैंधवा आणि थाळनेर भागामध्ये त्यांचा प्रंचड प्रमाणात दरारा होता. पारंपरिक पद्धतीने त्यांच्याकडेही रखवालदार याचे काम आहिल्यादेवी होळकर पासून त्यांच्याकडे होते. त्यांच्या हाताखाली जवळपास चारशे भिल्ल हत्यारबंध त्यांच्याकडे होते. त्यामुळे गुनामसिंग नाईक यांना भिल्लांचा सरदार म्हणून देखील ओळख होते. त्यांनी रखवालदार म्हणून काम करताना कधीही कोणासोबत बेईमानी केलेली नाही. त्याचे कारण सांगताना सी. सी. राठवा लिहितात की, "खानदेश ताब्यात आल्यानंतर सुरुवातीला इंग्रज अधिकारी हे स्थानिक किल्लेदार व वतनदार यांच्याशी फार कठोरपणे वागले. त्यांनी अनेकांना फाशी दिले. काहींना गोळ्या घालून ठार केले. हे प्रकार गुमानसिंगने स्वत: डोळ्यांने पाहिले होते. काळाची पावले ओळखून हकनाक इंग्रजाच्या हातून फाशी जाण्यापेक्षा किंवा त्यांच्या गोळ्यांना बळी पडण्यापेक्षा नमते घेऊन इंग्रजांच्या कारभारात मदत करायला काय हरकत आहे. असा शाहणपणाचा विचार मनात ठेवून सन 1818 पासून 1823 पर्यंत गुमानसिंगने त्याला सोपविलेले काम इमाने इतबारे केले."[3] येवढेच नाही तर जे भिल्ल लुटमार करीत किंवा दरोडे टाकत होते त्यांना त्यांनी

चांगले वागणूकीचे धडे देऊन ब्रिटिशांच्या हातून त्याचे पुनर्वसन केले.

**कुँवर वसावा :**

अक्कलकुवा तालुक्यात भिल्लांची मेवासी राज्ये होती. ही राज्ये ब्रिटिशपूर्व काळात व ब्रिटिश काळातही होती. या मेवासी राज्याचा जाहागीरदार जीवा वसावा हा होता. याचा मुलगा कुँवर वसावा हा आहे. जीवा वसावा यांनी राजपिपला राज्याचा काही डोंगरी भाग घेऊन त्याने स्वत:चे राज्य निर्माण केले. जीवा ने लुटमार, दरोडेखोरीचा मार्ग सोडून त्याने ब्रिटिशांना आसरा दिला. सन 24 सप्टेंबर 1818 रोजी जीवा वसावांनी इंग्रजांशी एक करार केला. परंतु हा करार कुँवर वसावाला मान्य नाही. या संदर्भात डॉ. गोविंद गारे लिहितात की, "गंगथा चिखली हे एक स्वतंत्र व सार्वभैम राज्य आहे. इंग्रजांशी झालेला करार हा इंग्रजांची नोकरी करण्याचा करार नसून दोन सार्वभौम सत्तांमधील सह अस्तित्वाचा करार आहे. आम्ही इंग्रज सरकारला राज्य कारभारात मदत करु ते नोकर म्हणून नव्हे तर मित्र म्हणून. इंग्रजांनी गंगथा चिखली राज्याच्या स्वातंत्र्य व सार्वभौमत्वात हस्तक्षेप करु नये"[4] असे मत कुँवार वसावा यांचे होते. त्यामुळे हा करार त्यांना मान्य नव्हता. याचा परिणाम असे आढळतो की कुँवर वसावा हे ब्रिटिशांना कधीही शरण गेले नाही.

**भागोजी नाईक :**

पूर्वीचे अहमदनगर आणि अत्ताचे अहिल्यानगर व नाशिक भागात भिल्ल आणि महादेव कोळी यांनी ब्रिटिशांविरोधात अनेक बंड केले होते. अपकाई-ठपकाई हे नाशिक मधील किल्ले ब्रिटिशांनी ताब्यात घेतल्यामुळे महादेव कोळी आणि भिल्लांचा ब्रिटिशांविरोधातला रोश अधिकच वाढला. त्यामुळे ठिकठिकाणी खजीने लुटने, लुटमार करणे, ब्रिटिशांच्या अधिकाऱ्यांची हत्या करणे असे चालूच होते. त्याचा परिणाम ब्रिटिशांना बंडाच्या सुत्रधाराना अटक् करुन कठोर शासन करण्यास सुरुवात केली. भागोजी नाईकाच्या नावाखाली अनेक उठाव झाले व हे उठाव अनेक प्रकारे धोकादायक होते. त्यामुळे भागोजी नाईकाची वतनदारी गेली. त्यांना नगरच्या पोलिस पथकात नोकरी देण्यात आली. भागोजी नाईक हे मूळचे सिन्नर तालुक्यातील नांदुरशिंगोटे या गावाचे रहीवासी होते. सन 1855 मध्ये त्यांनी महादेव कोळी यांच्या उठावाला पाठिंबा दिला असा अरोप त्यांच्यावर ठेवला आणि त्यांना एक वर्षाचा कारावास झाला. परत त्यांना नोकरीवर घेण्याचे ठरविले परंतु त्यांनी ते साफ नाकारले आणि बंडामध्ये उडी घेतली. "भागोजीने सिन्नर, संगमनेर, पारनेर येथील मामलेदारांनी शरण यावे असे आदेश दिले. इ. स. 1857 साल उजाडले. 'इंग्रजांचा पराभव करा' असे संदेश भारताच्या काणाकोपऱ्यात गेले होते. भागोजीचा उत्साह त्यामुळे अधिकच वाढला. त्याला अधिक स्फुरण चढले. भागोजीचा बंदोबस्त केलाच पाहिजे या जिद्दीने 20 ड्रेसवाले व 20 बिगरड्रेसवाले पोलिस घेऊन नगरचा पोलिस सुपरिटेन्डेन्ट् जे. डब्लू. हेण्ड्री त्याच्याविरुद्ध चाल करण्यास सिद्ध झाला. 'हत्यारे खाली ठेवून शरण या' असा आदेश त्याने भागोजीला दिला. 'हत्यारे खाली ठेवणार नाही व शरण येणार नाही' असे भागोजीने त्याला प्रतिआव्हान केले. चिडून जे. डब्लयू. हेण्ड्रीने भागोजीवर चाल केली. पहिल्याच माऱ्यात जे. डब्ल्यू. हेण्ड्रीच्या पाठीमागचा पोलिस ठार झाला आणि क्षणार्धातच दुसऱ्या गोळीने हेण्ड्रीही ठार झाला."[5] असा हा भागोजीचा पहिला प्रहार ब्रिटिशांविरोधाचा होता. हेण्ड्रीच्या पराभावाने भिल्ल आणि महादेव कोळी यांच्या बंडामध्ये अधिकच उधाण आले. यातूनच

खऱ्या अर्थाने भागोजीला बंडाला प्रेरणा मिळाली होती. परंतु काही दिवसानंतर ब्रिटिशांनी देऊ केलेल्या अमिशामुळे भिल्ल आणि महादेवकोळी यांच्या सैन्याला खीळ बसली. त्यांचा पराभव होऊ लागला. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी सर्वत्र त्यांचे गुप्तहेराचे जाळे पसरवले होते. याच काळात आमिषाला बळी पडलेल्यांनी ब्रिटिशांना भागोजीची माहिती दिली. या लढाईत भागोजीला ब्रिटिशांनी ठार केले.

**तंट्या भिल्ल :**

भाऊसिंग भिलाच्या पोटी तात्या उर्फ तंट्याचा जन्म इ. स. 1842 मध्ये मध्य प्रदेशातील निमाड या जिल्ह्यात पोखर गावी झाला. भाऊसिंग भिल हे शेती करुन आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. तात्याला लहानपणापासून तालमीची आवड होती. तात्या अवघ्या 24 वर्षाचा असतना एकदा गावातील मारका रेडा उधळला. त्याला पकडण्याची कोणाचीही हिम्मत होत नव्हती. तात्याने त्या रेड्याला अत्यंत चपळाईनी पकडले. त्यामुळे तात्याच्या नावाची आणि ताकतीची सर्वत्र वाहवा होऊ लागली.

काही दिवासानंतर तात्याच्या आईवडिलांचे दु:खद निधन झाले व त्याची सर्व वडिलोपार्जीत जमीन शिवाजी पाटील या वाटेकऱ्यानी बळकावली. शिवाजी पाटील एवढ्यावर थांबला नाही तर तात्याला त्याने चोरीचा आळ घालून तुरुंगात पाठवले. तात्याला या खोट्या आरोपामुळे एक वर्षाचा तुरुंगवास भोगावा लागला. ही शिक्षा भोगून आल्यानंतर पुन्हा जमीनदाराच्या मुलीच्या खोट्या आरोपामुळे तात्या ते गाव सोडून गेला. दुसऱ्या ठिकाणी राहण्यासाठी गेल्यानंतर तीन महिन्याने तिथे चोरी झाली आणि तात्याला तिथेही फसवले गेले. त्याने इंग्रजांची हद्द सोडून होळकरांच्या परिसरात जाऊन राहू लागला परंतु तिथेही छोट्यामोठ्या चोरीचा तात्याच बळी ठरला. तात्याला गुन्हेगार बनवले गेले. या संदर्भात विलास वाघ लिहितात की, "माझ्यापुढे प्रश्न होता, मुळात तंट्या गुन्हेगार बनलाच कसा ? तंट्याचे चरित्र वाचल्यावर दोन प्रमुख कारणे सापडतात. एक जातीप्रथा आणि दुसरे म्हणजे सरंजामशाही. मुळात तंट्या गुन्हेगारी स्वभावाचा नव्हता. तंट्या भिल्लाचे शिवा पटेलच्या मुलीशी प्रेमसंबंध जुळणे हा तंट्याचा सर्वात मोठा गुन्हा होता. त्यासाठी त्याला शिक्षा भोगावी लागली. संपूर्ण गावची जमीन दोन पटेलांच्या मालकीची. गावचे बाकी सर्व लोक भूमिहीन मजूर. तंट्याची जमीन शिवा पटेलाच्या ताब्यात. ती तंट्याने जबरदस्तीने हिसकावून घेतली हा त्याचा दुसरा गुन्हा. गावच्या लोकांनी ठरवून त्याला गुन्हेगार बनविले. म्हणजेच तंट्या जातिव्यवस्थेचा आणि सरंजामशाहीचा बळी ठरला."[6] यातून तंट्याने अन्याचाला वाचा फोडण्याचे काम केलेले आहे. इ. स. 1878 ते 1889 हा काळ तंट्याच्या कर्तबगारीने विशेषत्वाने गाजला आहे. तंट्याच्या धाडसी वृत्ती मुळे व लढाऊपणामुळे तंट्याची तुलना रॉबिनहूडशी होऊ लागली. तंट्याला नेहमीच गोरगरीबांचा पाठिंबा मिळत राहीला. गोरगरिबांना दरोडे आणि लुटमारीतून मिळालेले धन उदार मानने तो वाटत असे. स्त्रीयांना आणि मुलांना त्रास देणाऱ्यांना तंट्या कठोर शासन करत असे. त्यामुळे त्याची समाजात गरिबांसाठी देवाता अशी प्रतिमा तयार झाली होती. या संदर्भात डॉ. गोविंद गारे लिहितात की, "स्त्रियांना त्याने दिलेली वागणूक थोरपणाची होती. त्याबाबतच्या अनेक कथा आजही प्रचलित आहेत. अनेक गरिबांच्या मुलींच्या लग्नासाठी तंट्या पैसे देत असे. हुंड्यावाचून मुलींची लग्ने अडली असतील तर हुंड्यासाठी तंट्या पैसे देत असे. त्यामुळे गरीब लोक त्याला 'तंट्यामामा' असे म्हणत."[7] यावरील संदर्भातून तंट्या हा शेट,

सावकारांना, सरंजामशाहीवाल्याला त्रास देत होता. त्यांनी सामान्य जनतेच्या शोषाणातून मिळवलेली मिळकत तंट्या लुटून नेत असे व सर्वसामान्यांच्या कार्यासाठी दान देत होता. असे वर्तन तंट्याचे होते. परंतु बारा तेरा वर्षाच्या मुकाबल्यानंतर तंट्या थकला होता. तंट्यावर बक्षीस ठेवले होते. या फितुरीने तंट्याचा घात केला. त्याला पकडण्यात आले. तंट्याच्या विरोधात जबलपूरच्या कोर्टात खटला भरण्यात आला. इ. स. 1889 मध्ये तंट्याला फाशीची शिक्षा जाहीर झाली. तंट्याला फाशी होऊ नये यासाठी नागपूर बार संघाने मुख्य कमिशनकडे अपिल केले परंतु त्याचा काही फायदा झाला नाही. अखेर इ. स. 1889 मध्ये भिल्ल आदिवासींचा रॉबिनहूड तंट्यामामाला फाशी झाली.

सारांशरुपाने असे म्हणता येते की आदिवासींनी सर्वप्रथम ब्रिटिशांवरुद्ध आवाज उठवलेला आहे. अन्याय अत्याचारातून या आदिवासींच्या क्रांतीकारक तयार झालेले आहेत. कधी ब्रिटिशांनी तर कधी इथल्या सरंजामशाहीचे बळी ठरलेले हे आदिवासी नायक सर्वसामान्यासाठी हिरो होते. परंतु ब्रिटिशांनी त्यांना गुन्हेगार ठरवून शिक्षा ठोठावली.

**निष्कर्ष :**

1. आदिवासींच्या सांस्कृतिक जीवनात ढवळाढवळ करणाऱ्या ब्रिटिशांना हकलून लावण्यासाठी आदिवासींनी बंड केलेले आहे.
2. सरंजामशाहीचे बळी आदिवासी क्रांतिकारक ठरले.
3. प्रस्थापितांच्या इतिहासत आदिवासी क्रांतिकाराचे योगदान महत्त्वाचे आहे. याची नोंद इतिहासकारांनी घेतलेली दिसून येत नाही.

**संदर्भग्रंथ यादी :**

1. निकम गौतम, आदिवासींच्या समस्या : एक अभ्यास, विमलकीर्ती प्रकाशन, चाळीसगाव. आवृत्ती दुसरी 9 ऑगस्ट 2019, पृ. क्र. 69
2. चुडराम बल्हारपुरे, धरती आबा क्रांतिसूर्य बिरसा मुंडा, मधुश्री प्रकाशन पुणे, पृ. क्र. 4/5
3. राठवा सी. सी., शूर ॲमू – मर्द ॲमू अर्थात खानदेशातील अज्ञान आदिवासी वीर पुरुष, आदिरंग दिवाळी अंक 1999, आदिवासी साहित्य एवं सांस्कृतिक परिषद, नंदूरबार. पृ. क्र. 22
4. गारे गोविंद, सातपुड्यातील भिल्ल ऐतिहासिक आणि सामाजिक मागोवा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे. द्वितिया आवृत्ती 2019, पृ. क्र. 116
5. तत्रैव, पृ. क्र. 118
6. वाघ विलास, तंट्या भिल्ल, सुगावा प्रकाशन, पुणे. द्वितीयावृत्ती नोव्हेंबर 2012, निवेदन
7. गारे गोविंद, सातपुड्यातील भिल्ल ऐतिहासिक आणि सामाजिक मागोवा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे. द्वितिया आवृत्ती 2019, पृ. क्र. 123